# पद्मभूषण श्रीनिवास खळे अनंतात विलीन



आपल्या सर्वांगसुंदर रचनांनी तमाम मराठी मनाला गुंतवून करणारे संगीतकार पद्मभूषण श्रीनिवास खळे हे आज अनंतात विलीन झाले

"जय महाराष्ट्र माझा", "गोरी गोरी पान", "शुक्रतारा मंदवारा", "बगळ्यांची माळ फुले", "श्रावणात घन निळा', "निज माझ्या नंदलाला', "या चिमण्यांनो परत फिरा रे', "सावळे सुंदर रुप मनोहर' अशा अनेक गाण्यांना खळेकाकांनी अप्रतिम स्वरसाज चढविला. भावगीत, अभंग, बालगीते, पोवाडा, लावणी अशा सर्वच क्षेत्रांत त्यांचा हातखंडा होता. अगदी लहानपणापासून मनाला रिझवणारी अनेक गाणी ज्या खळेकाकांमुळे ऎकायला मिळाली ते आता आपल्यात नाहीत याचं वाईट वाटतं.

संगीतासाठीच जगणारे खळेकाका गेले, त्यांच्या आत्म्यास शांती लाभो हीच इश्वर चरणी प्रार्थना.

- नरेन्द्र प्रभू

http://prabhunarendra.blogspot.com

http://shabdshabd.blogspot.com/